दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

## सुविचार

नातं म्हणजे हक्क नाही तर जपणूक, अपेक्षा नाही तर समज, शब्दांपेक्षा भावना महत्त्वाच्या, आणि स्वार्थाऐवजी विश्वास ठेवला तर नात्यांना अर्थ मिळतो कारण प्रेम, आदर, संयम आणि नाती घट्ट होतात.

### मुंबईचा महापौर ११ तारखेला...

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदांच्या निवडीसाठी येत्या ११ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. प्रशासकीय तयारी जोरात सुरू असून, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया ६ फेब्रुवारीपासून सुरू होईल. अर्ज दाखल झाल्यानंतर ११ फेब्रुवारीला मतदान होईल आणि त्यानंतरच नव्या महापौराचे नाव स्पष्ट होईल. ही निवड विशेष सभेत होणार असून, महायुतीच्या नगरसेवकांचे बहुमत असल्याने त्यांचा उमेदवार विजयी होण्याची शक्यता मजबूत आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. ०१ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १२९ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### रेल्वे प्रकल्पांसाठी विक्रमी वाटप

**नवी दिल्ली :** रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आणि लोकांच्या हितासाठी सर्व राज्यांमध्ये नवीन कामे करण्यासाठी त्यांच्या मंत्रालयासाठी अर्थसंकल्पात विक्रमी तरतूद करण्यात आली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी रविवारी रेल्वेसाठी २.७८ लाख कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय मदतीची आणि एकूण २.९३ लाख कोटी रुपयांच्या भांडवली खर्चाची घोषणा केली. त्यांनी प्रमुख शहरांना जोडणारे सात हाय-स्पीड कॉरिडॉर आणि पश्चिम बंगालमधील दानकुनी आणि गुजरातमधील सुरत दरम्यान एक नवीन पूर्व-पश्चिम समर्पित फ्रेट कॉरिडॉर प्रस्तावित केला.



### महाराष्ट्र सरकारची कर्मचाऱ्यांना सुट्टी

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारने सोमवारी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी उद्योग, खाजगी कंपन्या आणि व्यावसायिक आस्थापनांमधील कर्मचाऱ्यांसाठी ७ फेब्रुवारी रोजी पगारी सुट्टी जाहीर केली. उद्योग, कामगार आणि खाण विभागाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, १८ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सर्व नोंदणीकृत मतदारांनी प्रत्येक निवडणुकीत मतदान करणे अपेक्षित आहे आणि मतदानाच्या दिवशी कर्मचाऱ्यांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी सुविधा देणे बंधनकारक आहे. कायदेशीर तरतुदी असूनही, काही आस्थापनांनी रजा देण्यात अयशस्वी ठरल्याने कामगारांना त्यांच्या मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले, असे निर्देशात नमूद केले आहे.

### विरोधी पक्षनेते राहुल गांधींना उतारे उद्धृत करण्यापासून रोखले

# लोकसभेतील गोंधळ आणि नियम ३४९

**दैनिक राज्य लोकतंत्र**



**नवी दिल्ली:** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सोमवारी (२ फेब्रुवारी) राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर चर्चा सुरू असताना लोकसभेत तीव्र गोंधळ झाला. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी माजी लष्करप्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे यांच्या आत्मचरित्राच्या मसुद्यातील काही उतारे उद्धृत करण्याचा प्रयत्न केल्यानंतर सत्ताधारी पक्षाने त्यावर जोरदार आक्षेप घेतला.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि गृहमंत्री अमित शहा यांनी अप्रकाशित आत्मचरित्राचा उल्लेख हा संसदीय नियमांच्या विरोधात असल्याचे सांगत राहुल गांधींना रोखले. यामुळे सत्ताधारी पक्ष आणि काँग्रेस सदस्यांमध्ये तीव्र वादावादी झाली. गोंधळ वाढत गेल्याने लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी दुपारी २:०९ वाजता सभागृहाचे कामकाज ३ वाजेपर्यंत तहकूब केले.

सभागृह पुन्हा सुरू झाल्यानंतर राहुल गांधी यांनी पुन्हा जनरल नरवणे यांचा उल्लेख केल्याने गोंधळ उफाळून आला. परिस्थिती नियंत्रणात न आल्याने अध्यक्षांनी कामकाज ४ वाजेपर्यंत तहकूब केले. या संपूर्ण गदारोळादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी सभागृहात उपस्थित होते. लोकसभा नियमावलीतील नियम ३४९ हा सदस्यांच्या वर्तन, शिस्त आणि शिष्टाचाराशी संबंधित आहे. या नियमानुसार कोणताही खासदार सभागृहात वर्तमानपत्र, मासिक किंवा पुस्तकातील उतारे वाचू शकत नाही. तसेच घोषणाबाजी, निदर्शने किंवा सभागृहाच्या कामकाजात अडथळा निर्माण करणारी कृती निषिद्ध आहे. झेंडे, फलक, पोस्टर्स, प्रतीके किंवा धार्मिक चिन्हे दाखवण्यासही मनाई आहे. दुसऱ्या सदस्याच्या भाषणात व्यत्यय आणणे नियमभंग मानले जाते आणि लोकसभा अध्यक्षांच्या सूचना व आदेशांचे पालन करणे प्रत्येक सदस्यावर बंधनकारक आहे. याच नियमाचा हवाला देत अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राहुल गांधींना आत्मचरित्रातील उतारे वाचण्यापासून रोखले.

राहुल गांधी यांनी चीनसोबतच्या भारताच्या लष्करी तणावाचा मुद्दा उपस्थित करताना असा दावा केला की माजी लष्करप्रमुखांनी आपल्या आत्मचरित्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या भूमिकेवर भाष्य केले आहे. यावर राजनाथ सिंह यांनी राहुल गांधी सभागृहाची दिशाभूल करत असल्याचा आरोप केला आणि संबंधित पुस्तक प्रकाशित झाले आहे की नाही, याचा खुलासा करण्याची मागणी केली.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेच्या सुरुवातीला राहुल गांधी यांनी भाजप खासदार तेजस्वी सूर्या यांच्या विधानाचा उल्लेख केला. सूर्या यांनी काँग्रेसच्या देशभक्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याचा आरोप करत, त्याला उत्तर देण्यासाठीच आपण आत्मचरित्रातील उतारा वाचण्याचा प्रयत्न केल्याचे राहुल गांधी यांनी स्पष्ट केले.

(संबंधित वृत्त पान - ४ वर)

# मुंढवा जमीन प्रकरणात पार्थ पवारचे नाव नाहीच

### १८८६ पानांचे दोषारोपपत्र; एकाचेच नाव

**दैनिक राज्य लोकतंत्र**



**पुणे :** मुंढवा येथील बहुचर्चित जमीन गैरव्यवहार प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने न्यायालयात १८८६ पानांचे दोषारोपपत्र दाखल केले आहे. मात्र या आरोपपत्रात केवळ शीतल तेजवानी यांचेच नाव आरोपी म्हणून नमूद करण्यात आल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. चर्चेत असलेले पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील यांची नावे आरोपपत्रात नसल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

या घडामोडींमुळे या दोन्ही नेत्यांना तात्पुरता दिलासा मिळाल्याचे मानले जात असले, तरी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. "हा न्याय नसून न्यायाची थट्टा आहे," अशी टीका करत त्यांनी तपास यंत्रणेच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी हा जमीन व्यवहार अवैध ठरवलेला असताना काही बड्या व्यक्तींना क्लिन चिट कशी मिळाली, असा सवाल आता राजकीय आणि सामाजिक वर्तुळात उपस्थित केला जात आहे. या प्रकरणातील पुढील तपास आणि न्यायालयाची भूमिका याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रवादीचे गट एकत्र येऊ नयेत म्हणून कट

**दैनिक राज्य लोकतंत्र**



**नागपूर :** आपल्या संस्कृतीनुसार दशक्रिया झाल्यावर घरातील कामकाज सुरळीत सुरू होते. राज्यातील राजकारण इतके सडके झाले आहे की कसलीही वाट न बघता शपथविधीचा कार्यक्रम करण्यात आला. यातूनच राष्ट्रवादीचे गट एकत्र येऊ नयेत हा कट शिजला, असा गंभीर आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात दोन्ही पक्ष विलीन होण्याबाबत चर्चा अंतिम टप्प्यात होती. आपल्या पक्षाबाबत त्यांनी भाजप किंवा मुख्यमंत्र्यांना सांगणे अपेक्षित होते का? त्यांच्या पक्षाचे निर्णय ते घेऊ शकत नव्हते की त्यासाठी भाजपची परवानगी लागत होती? असा टोला वडेट्टीवार यांनी लगावला.

अजित पवार यांच्या मृत्यूपेक्षा पक्षाच्या विलीनीकरणा बाबत जास्त चर्चा झाली. आपल्या मोठ्या नेत्याचा मृत्यू झाल्यावर दोन चार दिवस ही नेते थांबू शकले नाही यातून राजकारणात नैतिकता आणि नीतिमत्ता राहिली नाही हे महाराष्ट्र बघत आहे, अशी टीकाही विजय वडेट्टीवार यांनी केली. अजित पवार यांच्या पक्षातील सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल या नेत्यांना एनडीएसोबत राहण्याची अपरिहार्यता आहे. त्यांच्यावर विविध आरोप झाले आहेत. अशा वेळी शांत झोप लागावी यासाठी भाजपला साथ देण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नाही यातूनच विधाने केली जात असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

### साडेतीन तासांचा प्रवास तासाभरात

# मुंबई-पुणे हाय-स्पीड रेल्वेला अर्थसंकल्पातून गती

**दैनिक राज्य लोकतंत्र**



**पुणे :** मुंबई-पुणे हा सध्या साडेतीन तासांचा रेल्वे प्रवास लवकरच केवळ ४५ ते ६० मिनिटांत पूर्ण होण्याची शक्यता आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये रेल्वे क्षेत्रासाठी करण्यात आलेल्या मोठ्या तरतुदीमुळे मुंबई-पुणे हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पाला वेग मिळाला असून, दळणवळणाच्या क्षेत्रात हा प्रकल्प महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात रेल्वेसाठी २,७८,००० कोटी रुपयांची तरतूद जाहीर केली आहे. या निधीतून हाय-स्पीड रेल्वे, मालवाहतूक क्षमता वाढवणे आणि रेल्वे सुरक्षेवर भर देण्यात येणार आहे. देशभरात सात नवीन हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर विकसित करण्याची घोषणा करण्यात आली असून, त्यात मुंबई-पुणे हा मार्ग अग्रक्रमावर आहे. या प्रगत तंत्रज्ञानामुळे मुंबई ते पुणे हे अंतर एका तासापेक्षा कमी वेळात कापता येईल, असा दावा रेल्वे मंत्रालयातील सूत्रांनी केला आहे.

देशातील कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करण्यासाठी निवडलेल्या सात हाय-स्पीड कॉरिडॉरमध्ये मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद, हैदराबाद-बेंगळुरू, हैदराबाद-चेन्नई, चेन्नई-बेंगळुरू, दिल्ली-वाराणसी आणि वाराणसी-सिलीगुडी या मार्गांचा समावेश आहे. या मार्गांमुळे केवळ महाराष्ट्रातील प्रमुख शहरे जवळ येणार नाहीत, तर पश्चिम आणि दक्षिण भारतातील संपर्क अधिक जलद आणि सुलभ होईल. उदाहरणार्थ, मुंबई ते हैदराबाद हा प्रवास सुमारे १ तास ५५ मिनिटांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

सध्या मुंबई-पुणे रेल्वे प्रवास घाट विभागातील मर्यादांमुळे वेळखाऊ ठरतो. लोणावळा-खंडाळा घाटातील तीव्र चढ-उतार आणि वळणांमुळे गाड्यांचा वेग कमी ठेवावा लागतो. प्रस्तावित हाय-स्पीड कॉरिडॉरमध्ये मात्र या अडचणींवर आधुनिक अभियांत्रिकी तंत्रज्ञानाच्या मदतीने मात केली जाणार आहे. नव्या मार्गावर बोगदे, उड्डाणपूल आणि सरळ ट्रॅकचा अधिक वापर होण्याची शक्यता आहे.

या प्रकल्पामुळे केवळ प्रवाशांचा वेळ वाचणार नाही, तर आर्थिक विकासालाही चालना मिळणार आहे. अर्थमंत्र्यांनी या हाय-स्पीड कॉरिडॉरना 'ग्रोथ कनेक्टर्स' असे संबोधले आहे. मुंबई आणि पुणे ही दोन्ही शहरे औद्योगिक, आयटी आणि शिक्षणाची प्रमुख केंद्रे असल्याने त्यांच्यातील अंतर कमी झाल्यास रोजगाराच्या संधी वाढतील, व्यापार सुलभ होईल आणि मालवाहतूक अधिक कार्यक्षम बनेल.

पश्चिम आणि दक्षिण भारताला जोडणारा मुंबई-पुणे हाय-स्पीड रेल्वे प्रकल्प दळणवळणाच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठा बदल घडवू शकतो. नियोजन आणि अंमलबजावणी वेळेत झाली, तर साडेतीन तासांचा प्रवास तासाभरात पूर्ण होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरण्याची शक्यता आहे.

# पीसीएमसीत भाजप-राष्ट्रवादी एकत्र?

### पिंपरी चिंचवड महापालिकेत सत्तासहकार्याचे संकेत

**दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रित सत्तेत सहभागी होण्याची शक्यता बळावली आहे. शहराच्या एकत्रित विकासासाठी राष्ट्रवादीला सोबत घेण्यास भाजप सकारात्मक असल्याचे भाजपचे गटनेते प्रशांत शितोळे यांनी स्पष्ट केल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

भाजपकडून रवी लांडगे यांची महापौरपदासाठी निवड करण्यात आली असून त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मात्र, उपमहापौरपदासाठी भाजपकडून चर्चेत असलेल्या शितल शिंदे यांनी पद स्वीकारण्यास नकार दिल्याने ऐनवेळी उमेदवार बदलण्याची वेळ पक्षावर आली. अखेर भाजपच्या ज्येष्ठ नगरसेविका शर्मिला बाबर यांनी उपमहापौरपदासाठी अर्ज दाखल केला.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसने स्वर्गीय अजित पवार यांना श्रद्धांजली म्हणून महापौरपदाची निवडणूक लढवणार नसल्याचे जाहीर केले होते. मात्र, उपमहापौरपदासाठी राष्ट्रवादीकडून वैशाली काळभोर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने दोन्ही पक्ष सत्तेत एकत्र बसणार का, याबाबत तर्कवितर्क सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना प्रशांत शितोळे यांनी शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी राष्ट्रवादीला सोबत घेण्यास आम्ही तयार असल्याचे स्पष्ट केले. तसेच, शिष्टाचार पाळत महापौरपदाच्या निवडीनंतर कोणताही जल्लोष किंवा आनंद साजरा केला जाणार नसल्याचेही त्यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजप आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये तीव्र संघर्ष पाहायला मिळाला होता. दिवंगत अजित पवार आणि भाजप आमदार महेश लांडगे यांच्यातील वाकयुद्ध राज्यभर चर्चेत होते. अखेर या लढतीत महेश लांडगे यांची सरशी झाली. आता अजित पवार यांच्या निधनानंतर संघर्ष टाळून सत्तेत एकत्र बसण्याच्या हालचाली सुरू झाल्याचे संकेत मिळत आहेत.

### एअर इंडियाच्या विमानात तांत्रिक बिघाड

**नवी दिल्ली :** लंडनहून बेंगळुरूकडे झेपावलेल्या एअर इंडियाच्या बोइंग ७८७-८ विमानामध्ये उड्डाणादरम्यान तांत्रिक बिघाड झाल्याची धक्कादायक घटना सोमवारी घडली. विमानाच्या 'फ्यूल कंट्रोल स्विच'मध्ये बिघाड झाल्याचे लक्षात येताच वैमानिकाने प्रसंगावधान राखत विमानाचे तातडीने लँडिंग केले. या घटनेमुळे विमानात काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते, मात्र सुदैवाने सर्व प्रवासी आणि क्रू मेंबर्स सुरक्षित असल्याचे एअरलाईन प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत एअर इंडियाने अधिकृत निवेदन प्रसिद्ध केले आहे. वैमानिकाने इंधन नियंत्रण स्विचमधील संभाव्य त्रुटी निदर्शनास आणून दिल्यानंतर कंपनीने तातडीने पावले उचलली आहेत.

# पाकमधील अफगाण सीमेवर अराजक

**दैनिक राज्य लोकतंत्र**



**क्वेटा :** पाकिस्तानच्या सुरक्षा दलांनी अफगाणिस्तान सीमेवरील बंडखोरीग्रस्त नैऋत्य भागात रात्री केलेल्या सलग छाप्यांत सुमारे दोन डझन दहशतवाद्यांना ठार केले. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, गेल्या ४८ तासांत ठार झालेल्या दहशतवाद्यांची संख्या १७७ वर पोहोचली आहे. याच कालावधीत बंडखोरांच्या समन्वित हल्ल्यांत किमान ३३ जणांचा मृत्यू झाला असून त्यात बहुसंख्य नागरिकांचा समावेश आहे.

शनिवारी सकाळपासूनच प्रांतातील पोलिस ठाण्यांवर, नागरिकांच्या घरांवर आणि सुरक्षा सुविधांवर आत्मघातकी बॉम्बस्फोट व गोळीबाराचे हल्ले झाल्यानंतर, पोलिसांनी लष्कराच्या मदतीने अनेक भागांत छापेमारी सुरू केली आहे. या कारवाया बेकायदेशीर बलुच लिबरेशन आर्मीच्या सदस्यांविरोधात करण्यात येत आहेत.

विश्लेषकांच्या मते, गेल्या ४८ तासांत अतिरेक्यांच्या मृत्यूची संख्या ही गेल्या काही दशकांतील सर्वाधिक आहे. आठवड्याच्या शेवटी झालेल्या, बीएलएने दावा केलेल्या हल्ल्यांत १८ नागरिक आणि सुरक्षा दलातील १५ जवान ठार झाले. या घटनांचा पाकिस्तानमधील विविध राजकीय नेत्यांनी तीव्र निषेध केला असून, तुरुंगात असलेल्या माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या पक्षातील सदस्यांचाही त्यात समावेश आहे.

दरम्यान, सोमवारी गृहमंत्री मोहसिन नक्वी यांनी निवेदनात सुरक्षा दलांनी २२ अतिरेक्यांना ठार केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. त्यांनी या दहशतवाद्यांना "भारतीय समर्थित" असे संबोधले. याच पार्श्वभूमीवर, भारताने पाकिस्तानकडून करण्यात आलेले आरोप ठामपणे फेटाळले. परराष्ट्र मंत्रालयाने हे आरोप निराधार असल्याचे सांगत, इस्लामाबादच्या अंतर्गत सुरक्षेतील अपयशांवरून लक्ष विचलित करण्याचा हा नेहमीचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट केले. रणधीर जयस्वाल यांनी बलुचिस्तानमधील दीर्घकालीन राजकीय व आर्थिक प्रश्नांकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे नमूद केले.

### हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्चमध्ये सुरू

# मेट्रो मार्गिकेच्या विस्तारासाठी ५१७ कोटींचा निधी

**दैनिक राज्य लोकतंत्र**



**पुणे :** येत्या मार्च महिन्यात पुणेकरांसाठी दिलासादायक बातमी आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर ही बहुप्रतिक्षित मेट्रो मार्गिका लवकरच प्रवाशांच्या सेवेत येणार असून, सध्या जवळपास दोन तास लागणारा प्रवास अवघ्या अर्ध्या तासात पूर्ण होणार आहे. यामुळे आयटी कर्मचारी आणि शहरातील प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. दरम्यान, काल सादर झालेल्या अर्थसंकल्पात पुण्यातील मेट्रो मार्गिकेच्या विस्तारासाठी ५१७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

महा मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की अर्थसंकल्पात मंजूर झालेल्या निधीच्या नेमक्या विभागणीबाबत सविस्तर माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. ही माहिती मिळाल्यानंतरच निधीच्या वापरासंदर्भात एक सर्वसमावेशक आराखडा तयार केला जाईल. मात्र, प्रारंभी हा निधी प्रामुख्याने सुरू असलेल्या पहिल्या टप्प्यातील प्रकल्पांसाठी वापरला जाण्याची शक्यता आहे.

पिंपरी ते निगडी ही सुमारे ४.५ किलोमीटर लांबीची एलिव्हेटेड मेट्रो मार्गिका पुढील वर्षी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महा मेट्रोने ठेवले आहे. या प्रकल्पाचे सुमारे ५० टक्के काम आतापर्यंत पूर्ण झाले असून उर्वरित काम गतीने सुरू आहे. याशिवाय, स्वारगेट ते कात्रज या भूमिगत मेट्रो मार्गिकेसाठी बोगदा खोदण्याचे काम येत्या पावसाळ्यापूर्वी सुरू होण्याची अपेक्षा आहे. या कामासाठी विशेष तज्ज्ञ एजन्सीची नियुक्ती करण्यात आली असून, आवश्यक तांत्रिक तयारी पूर्ण झाली आहे. हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोच्या चाचणी फेऱ्या यशस्वीपणे पूर्ण झाल्या असून, डॉ. योगेश म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली या चाचण्या पार पडल्या. सर्व तांत्रिक बाबींची पडताळणी पूर्ण झाल्याने मार्चमध्ये उद्‌घाटनासाठी ही मार्गिका सज्ज झाली आहे. ही मेट्रो मार्गिका शिवाजीनगरला राजीव गांधी आयटी पार्क, हिंजवडीशी थेट जोडणार आहे. या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणावर आयटी कर्मचाऱ्यांची वर्दळ असते. सुमारे २.२ लाखांहून अधिक कर्मचारी आणि जवळपास ८०० कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना या मेट्रोचा थेट लाभ होणार आहे. त्यामुळे या मार्गावरील कायमची वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे.

विद्यापीठ चौक परिसरात या मेट्रोसाठी डबल डेकर वाहतूक व्यवस्था उभारण्यात येत आहे. सर्वात खालच्या स्तरावर स्थानिक वाहनांसाठी रस्ता, त्यावर उड्डाणपूल आणि सर्वात वर मेट्रो मार्गिका अशी रचना असणार आहे. यामुळे पुण्यातील सर्वाधिक गर्दीच्या भागातील वाहतूक कोंडी फोडण्यात मदत होणार आहे. हिंजवडी-शिवाजीनगर मार्गिकेवर एकूण २३ स्थानके असून, या संपूर्ण मार्गासाठी १४ ट्रेनसेट तयार ठेवण्यात आले आहेत. पुणेकर या मेट्रोची आतुरतेने वाट पाहत आहेत.

दरम्यान, अर्थसंकल्पात महा मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील विस्ताराचीही माहिती देण्यात आली आहे. सध्या पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये दोन मेट्रो मार्गिका सुरू असून, तिसरी लवकरच प्रवाशांसाठी खुली होणार आहे. २०२७ पर्यंत पिंपरी-निगडी हा सुमारे ४.५ किलोमीटर लांबीचा मार्ग पूर्ण होण्याची शक्यता आहे.

# राज्यात चार वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

### प्रशासकीय वर्तुळात हालचालींना वेग

**दैनिक राज्य लोकतंत्र**

**मुंबई :** महाराष्ट्राच्या प्रशासकीय वर्तुळात वेगाने खांदेपालट सुरू असून सोमवारी चार वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार हे निर्णय घेण्यात आले आहेत.

फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून गेल्या वर्षभरात प्रशासकीय बदल्यांचा धडाका सुरू आहे. साधारण दर १० ते १५ दिवसांत ८ ते १० सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या होत असून, हीच परंपरा या आठवड्यातही कायम राहिली आहे. श्रीधर दुबे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी विपणन महासंघ, मुंबई यांची आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सत्यजित बडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांची अपंग व्यक्तींसाठी आयुक्त, पुणे म्हणून बदली करण्यात आली आहे. डॉ. सुनील भोकरे महाराष्ट्र एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई येथील प्रकल्प संचालक (शहरी आरोग्य) यांची आयुक्त, मुंबई म्हणून नियुक्ती झाली आहे. राहुल कुलकर्णी अधिसूचना दिनांक २८ जानेवारी नुसार, सहसचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांची महाराष्ट्र राज्य सहकारी विपणन महासंघ, मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# संपादकीय

## शासन, न्याय आणि लोकहित

**राजकीय आणि सामाजिक नेतृत्वाची खरी कसोटी नीती, न्याय आणि लोककल्याणाच्या ताळमातीत निर्णय स्वीकारण्यात आहे. केवळ व्यवस्थापनावर नव्हे, तर नीतीच्या नैतिक पायावर उभे असलेले शासनच सशक्त आणि दीर्घकाल टिकणारे ठरते.**



वर्तमान राजकीय आणि प्रशासनिक निर्णयांचे विश्लेषण करताना, न्याय, नैतिकता आणि धोरणात्मक स्पष्टता यांची चर्चा करणे अपरिहार्य होते. शासन हे फक्त सत्ता चालवण्याचे यंत्रणा नाही; त्याचे तत्त्व लोकहित, न्याय आणि सार्वजनिक अपेक्षा यांच्यात संतुलन साधणे हाच आहे. यासाठी, शासनप्रक्रिया आणि त्याचे तात्त्विक स्वरूप समजून घेणे गरजेचे आहे. कोणत्याही व्यवस्थेचा पाया विश्वास आणि उत्तरदायित्व आहे. लोकशाही व्यवस्था ही जनतेच्या विश्वासावर उभी असते आणि शासनाचे काम हे विश्वास ठेवण्याजोगे निर्णय घेणे हा आहे. या निर्णयांची नैतिकता आणि तर्कसंगतता यावर लोकांचा विश्वास अवलंबून असतो. जेव्हा शासन केवळ तात्पुरत्या फायदे किंवा राजकीय अपेक्षांवरून निर्णय घेतो, तेव्हा त्याचे परिणाम दीर्घकाळापर्यंत नकारात्मक स्वरूपाचे ठरू शकतात. न्याय आणि समानतेचा प्रश्न शासनाच्या मूलभूत उद्दिष्टांपैकी एक आहे. शासनाने ज्या निर्णयांचा आधार नागरिकांच्या मूलभूत हक्क आणि सामाजिक समानतेवर ठेवावा, ते निर्णय प्रभावी आणि दीर्घकाल टिकणारे ठरतात. व्यवहारिक स्तरावर, न्याय ही फक्त कायदेशीर चौकट नाही, तर समाजातील विविध घटकांना समान संधी, समान न्याय आणि समान आश्वासन मिळण्याची प्रक्रिया आहे. शासनातील निर्णयांनी जेव्हा लोकांच्या दैनंदिन जीवनावर थेट परिणाम होतो, तेव्हा त्यांच्या अपेक्षांची जाणीव ठेवणे फार महत्त्वाचे ठरते. कर नीति, सार्वजनिक खर्च, सामाजिक धोरणे किंवा आर्थिक योजनाः या सर्व बाबतीत निर्णय घेणारा शासन यंत्रणा महसूल उत्पन्न किंवा स्पर्धात्मक फायदा यापेक्षा अधिक मोठ्या सामाजिक परिणामाचा विचार करतो हे आवश्यक आहे. नागरिकांचे कर हे फक्त आर्थिक देणे नसून, त्या माध्यमातून सरकार आणि जनता यांच्यातील विश्वासाचे बंध अधिक दृढ करणे हे त्याचे तात्त्विक महत्त्व आहे. नैतिकता आणि प्रशासन यांच्यातील संबंध समजू इच्छिताना, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व हे दोन महत्त्वाचे पैलू लक्षात घेतले पाहिजेत. पारदर्शकता म्हणजे शासनाच्या निर्णयमोजणीची प्रक्रिया सर्वांसमोर स्पष्ट असणे, तर उत्तरदायित्व म्हणजे त्या निर्णयांचे परिणाम स्वीकारण्याची तयारी असणे. प्रशासन यंत्रणेने आपल्या धोरणांचे नियोजन करताना या दोन्ही गोष्टींचा खुलासा करणे आवश्यक आहे. लोकशाही शासनामध्ये न्यायालयाचा सहभाग शासनाचे पर्यवेक्षण करतो असे समजले जाते. मात्र न्यायालयीन निर्णय हे फक्त कायदेशीर प्रश्नांपुरते मर्यादित नसून नैतिक आणि संवैधानिक आदर्शांशी निगडित असतात. त्यामुळे न्यायालय हे शासनाच्या धोरणांचे एक संतुलनकारक अंग म्हणून कार्य करते. हे संतुलन फक्त नियमाचे पालन योजणे नाही, तर समाजातील नैतिक अपेक्षांची पूर्तता असते. आजच्या सामाजिक संदर्भात शासन आणि न्यायामध्ये नैतिकतेची भूमिका यांना अधिक महत्व येते. नागरिकांना केवळ कायदा मिळणे पुरेसे नाही; न्यायाला प्रत्यक्ष जाणवायला पाहिजे, असा विश्वास निर्माण करणे हे शासनाचे काम आहे. शासनाच्या निर्णायोग्य क्षेत्रात जर न्याय्य वितरण आणि सामाजिक समता यांचा आधार नसेल, तर सत्तेचा वापर राजकीय किंवा तात्पुरत्या फायद्यांसाठी झाल्याचा आरोप उद्भवणं सहज शक्य आहे. शासनाच्या नैतिकतेचे मूल्य दीर्घकालीन परिणाम आणि लोकांच्या जीवनातील प्रत्यक्ष फरक यांतून मोजले जाते. जर निर्णय घेताना भावनिक लोकनिती किंवा दलगत स्वार्थ महत्त्वाच्या ठरल्या, तर शासनाची गुणवत्ता कमी होते आणि जनतेचा विश्वास कमकुवत होतो. त्यामुळे शासनाने धोरणात्मक दूरदृष्टी, न्याय्य वितरण आणि पारदर्शक विचार यांना प्राथमिकता देणे आवश्यक असते. शासन आणि प्रजा यांच्यातील विश्वासाचे नाते हे दोन्ही बाजूंनी जबाबदारीची अपेक्षा ठेवते. प्रजा आपल्या जीवनाशी निगडीत मूलभूत सेवांमध्ये न्याय अपेक्षित करते, तर शासनाला ती सेवा न्याय्य, पारदर्शक आणि प्रभावी पद्धतीने पुरवणे अपेक्षित असते. या समन्वयातूनच मजबूत लोकशाहीचे नीटनेटके रूप उभारले जाते. शासनाचे सत्यस्वरूप म्हणजे लोकहित, न्याय आणि प्रशासन यांचा संगम. या तिन्ही पैलूंमध्ये संतुलन राखणे हे शासनाची खरी कसोटी आहे. निर्णयांची नैतिक आधारबळ, न्याय्य अभिप्रेतता आणि लोकहिताची प्राथमिकता यांचे संयोजनच शासनाला अखंडनीय, प्रभावी आणि विश्वासार्ह बनवते. हे तत्त्व तात्पुरत्या लाभांपेक्षा दीर्घकाल टिकणाऱ्या सामाजिक बळावर आधारित आहे. शासनाचा अर्थ व्यवस्थापन आणि अधिकार यापेक्षा आर्थिक, सामाजिक आणि नैतिक दृष्टीकोनातून समजून घेतल्यासच तो सशक्त आणि परिणामकारक ठरतो. न्याय, नैतिकता आणि शासन यांच्यात ताळमेळ राखणे हे फक्त तात्पुरते उपक्रम नाही; ते लोकशाही व्यवस्थेचे मूलभूत तत्त्व आहे.

# चाबहारचा थांबा : रणनीती की शरणागती?

**» अर्थसंकल्पात एखादी तरतूद असण्याइतकेच तिचे नसणेही अर्थपूर्ण असते. चाबहार बंदरासाठी निधी न ठेवण्याचा निर्णय हा केवळ आर्थिक गणिताचा भाग नसून भारताच्या परराष्ट्र धोरणातील सावधपणा, मर्यादा आणि भू-रणनीतिक द्विधा मनःस्थिती उघड करणारा ठरतो.**



केंद्रीय अर्थसंकल्पात चाबहार बंदरासाठी निधीची तरतूद न होणे हा योगायोग नाही. तो एक जाणीवपूर्वक घेतलेला निर्णय आहे आणि म्हणूनच तो अधिक प्रश्न उपस्थित करणारा आहे. गेल्या दशकभरात चाबहार हा भारताच्या परराष्ट्र धोरणातील महत्त्वाचा दुवा मानला जात होता. आज मात्र त्या दुव्याला सैल सोडले गेले आहे. हा निर्णय केवळ आर्थिक काटकसरीचा नाही; तो भारताच्या सामरिक विचारसरणीची चाचपणी करणारा आहे. चाबहार बंदराचे स्थान भारतासाठी अत्यंत मोलाचे आहे. पाकिस्तानला वगळून अफगाणिस्तान, मध्य आशिया आणि पुढे युरोपपर्यंत पोहोचण्याचा तो एकमेव व्यवहार्य मार्ग आहे. चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरमुळे ग्वादार बंदराला जे महत्त्व प्राप्त झाले, त्याला उत्तर म्हणून भारताने चाबहारकडे पाहिले होते. त्यामुळे चाबहार हा फक्त व्यापाराचा नव्हे, तर आशियातील सामरिक संतुलनाचा प्रकल्प होता. परंतु आंतरराष्ट्रीय राजकारण आदर्शांवर नव्हे, तर हितसंबंधांवर चालते. इराणवरील अमेरिकेचे निर्बंध, पश्चिम आशियातील अस्थिरता आणि भारत-अमेरिका संबंधांचे वाढते महत्त्व यामुळे भारतासमोर अवघड पर्याय उभा राहिला. एका बाजूला स्वायत्त परराष्ट्र धोरणाचा दावा, तर दुसऱ्या बाजूला जागतिक आर्थिक वास्तव. या कात्रीतूनच चाबहारसाठी निधी न देण्याचा 'सावध' निर्णय पुढे आला. सरकार हा निर्णय माघारीचा नसल्याचे सांगते. ही केवळ 'रणनीतिक विश्रांती' असल्याचा युक्तिवाद केला जातो. आतापर्यंत केलेली गुंतवणूक, बंदराचे मर्यादित स्वरूपात सुरू असलेले संचालन आणि भविष्यातील पर्याय खुले ठेवण्याची भाषा वापरली जाते. मात्र परराष्ट्र धोरणात मौनालाही अर्थ असतो. बजेटमधील शून्य तरतूद हा आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पष्ट संदेश देणारा संकेत आहे. हा संकेत सर्वाधिक कोणासाठी उपयुक्त ठरू शकतो, याचा विचार करणे गरजेचे आहे. चीन आधीच ग्वादार, हम्बनटोटा आणि जिबूतीसारख्या बंदरांद्वारे आपले 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' धोरण आक्रमकपणे राबवत आहे. भारताने चाबहारमध्ये मागे हटल्यास इराणकडे पर्यायांची कमतरता नाही. आर्थिक गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि निर्बंधांकडे दुर्लक्ष करण्याची तयारी चीनकडे आहे. त्यामुळे भारताचा थांबा म्हणजे चीनसाठी संधी ठरू शकतो. इथे भारताच्या परराष्ट्र धोरणातील जुना पेच पुन्हा समोर येतो. 'रणनीतिक स्वायत्तता' ही संकल्पना आकर्षक आहे, पण तिची किंमत असते. अमेरिका हा आज भारताचा महत्त्वाचा व्यापारी, तंत्रज्ञान आणि संरक्षण भागीदार आहे. त्या नात्याने अमेरिकेच्या निर्बंधांना उघड आव्हान देण्याची तयारी भारताकडे सध्या दिसत नाही. मात्र प्रत्येक वेळी दबावाला झुकत राहिल्यास स्वतंत्र धोरणाचा दावा पोकळ ठरण्याचा धोका असतो. चाबहारचा मुद्दा त्यामुळे एका बंदरापुरता मर्यादित राहत नाही. तो भारत स्वतःला जागतिक राजकारणात कुठे उभे करतो, याचा आरसा आहे. बहुध्रुवीय जगाचा पुरस्कार करणारा भारत प्रत्यक्षात मात्र एका प्रभावक्षेत्राभोवतीच फिरतो आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. रशियाशी ऊर्जा व्यवहार, चीनबाबत सीमावाद आणि पश्चिम आशियातील संतुलन या सर्व बाबतीत भारताने नेहमीच मध्यममार्ग स्वीकारला आहे. चाबहारचा निर्णयही त्याच परंपरेतील वाटतो. सरकारच्या बाजूने काही व्यावहारिक मुद्दे मांडले जातात. इराणमधील अंतर्गत अस्थिरता, प्रकल्पांची संथ गती आणि आर्थिक परतावा याबाबतची अनिश्चितता नाकारता येत नाही. मात्र मोठ्या राष्ट्रांचे निर्णय केवळ तात्कालिक नफा-तोट्यावर आधारित नसतात. ते दीर्घकालीन परिणाम पाहून घेतले जातात. त्या अर्थाने चाबहार हा खर्च नव्हता, तर रणनीतिक गुंतवणूक होती. आज चाबहारसाठी निधी नाही; उद्या धोरण बदलू शकते. पण आंतरराष्ट्रीय राजकारणात 'थांबा' हाही एक ठोस निर्णय असतो आणि त्याची किंमत मोजावी लागते. भारताने हा थांबा किती काळासाठी आणि कोणत्या अटींवर घेतला आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र इतके नक्की की चाबहारचा प्रश्न भारताच्या परराष्ट्र धोरणातील आत्मविश्वास, मर्यादा आणि दूरदृष्टी यांची कसोटी ठरणार आहे. हा निर्णय पुढे दूरदृष्टीचा ठरतो की संधी दवडल्याची नोंद बनतो, हे इतिहास ठरवेल.

# शहराच्या प्रगतीची घोडदौड कायम राहील – आ. जगताप

## महापौरपदासाठी रवी लांडगे, उपमहापौरपदासाठी शर्मिला बाबर यांचे उमेदवारी अर्ज दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासाची घोडदौड पुढील काळातही अखंड सुरू राहील, असा ठाम विश्वास निवडणूक प्रचार प्रमुख तथा आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला. भारतीय जनता पक्षाच्या वतीने महापौरपदासाठी रवी लांडगे आणि उपमहापौरपदासाठी शर्मिला बाबर यांचे उमेदवारी अर्ज सोमवारी अधिकृतरीत्या दाखल करण्यात आले. यानिमित्ताने शहराच्या विकासाला अधिक गती देण्याचा संकल्प भाजप नेतृत्वाने पुन्हा एकदा अधोरेखित केला.

भाजपला पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत नागरिकांनी घवघवीत यश दिले असून, एकहाती विश्वास टाकला आहे. हा विश्वास सार्थ ठरवण्याची जबाबदारी आता प्रत्येक नगरसेवकावर असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी स्पष्ट केले. "जबाबदार पालक" या भावनेतून भाजपचे प्रत्येक नगरसेवक काम करेल. पक्षाची शिस्त, संघटन आणि साधनसुचिता या मूल्यांनुसार महापालिकेचे सभागृह कार्यरत राहील, असेही त्यांनी नमूद केले.

उमेदवारी अर्ज दाखल करताना सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, भोसरीचे आमदार महेश लांडगे, विधानपरिषदेच्या आमदार उमा खापरे व अमित गोरखे, भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, ज्येष्ठ नगरसेविका अनुराधा गोरखे, नगरसेविका नम्रता लोंढे, ज्येष्ठ नगरसेवक राजू मिसाळ, नगरसेवक अभिषेक बारणे, माजी उपमहापौर केशव घोळवे यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी आमदार जगताप म्हणाले की, महापौर म्हणून रवी लांडगे यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेच्या सभागृहातून शहराच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्वाचे निर्णय घेतले जातील. पिंपरी-चिंचवड शहर हे औद्योगिक, शैक्षणिक व निवासी क्षेत्र म्हणून झपाट्याने विकसित होत असून, या विकासाला योग्य दिशा देण्याचे काम भाजप करेल. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली रवी बाबासाहेब लांडगे यांनी महापौरपदासाठी, तर शर्मिलाताई बाबर यांनी उपमहापौरपदासाठी अर्ज दाखल केला आहे. भाजपच्या माध्यमातून शहरात आरोग्य, शिक्षण, क्रीडा, पाणी व्यवस्थापन तसेच सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विकास साधण्यात आला आहे.

# सिंहगड डेंटल कॉलेजची मान्यता रद्द; विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह

## वेतन थकबाकी व कामबंद आंदोलनाचे गंभीर परिणाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** विद्यापीठ अधिनियमातील अटी व शर्तींचा भंग केल्याच्या कारणावरून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने (एमयूएचएस) पुण्यातील सिंहगड दंत महाविद्यालय व रुग्णालयाची मोठी मान्यता रद्द केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून या महाविद्यालयातील पदवी (बीडीएस) व पदव्युत्तर (एमडीएस) अभ्यासक्रमांची संलग्नता रद्द करण्यात आली असून, त्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अडचणीत आले आहे.

सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या या महाविद्यालयात शिक्षक व कर्मचाऱ्यांचे वेतन दीर्घकाळ थकीत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला होता. तब्बल ७८ शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाच्या गाऱ्हाणे निवारण समितीकडे तक्रार दाखल केली होती. कर्मचाऱ्यांचे वेतन मे २०१४ पासून थकीत असल्याचे उघड झाले. वारंवार सूचना देऊनही व्यवस्थापनाने वेतनाचा प्रश्न सोडवला नाही. या पार्श्वभूमीवर १० नोव्हेंबर २०२५ पासून कामबंद आंदोलन सुरू झाले. परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले, तसेच रुग्णालयीन सेवा विस्कळीत झाल्याचे त्रिसदस्यीय समितीच्या अहवालातून स्पष्ट झाले. अखेर कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतरही सुधारणा न झाल्याने विद्यापीठाने कठोर भूमिका घेत संलग्नता रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. आता या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पुढील शिक्षण कसे होणार, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# पुणे पोर्शे अपघात ; चार आरोपींना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पुण्यातील बहुचर्चित पोर्शे कार अपघात प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय देत चार आरोपींना जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणातील प्रमुख आरोपी मानले जाणारे आदित्य अविनाश सूद याच्यासह आशीष मित्तल आणि अमर गायकवाड यांना जामिनावर मुक्त करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या निर्णयामुळे देशभरात चर्चेत असलेल्या या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

19 मे 2024 रोजी पुण्यातील कल्याणीनगर परिसरात मद्यधुंद अवस्थेत अल्पवयीन मुलाने पोर्शे कार चालवत दोन आयटी अभियंत्यांना चिरडले होते. या भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. अपघातानंतर केवळ निष्काळजी वाहनचालकत्वच नव्हे, तर तपासातही गंभीर गैरप्रकार झाल्याचे आरोप समोर आले. अल्पवयीन आरोपीला वाचवण्यासाठी रक्तनमुने बदलल्याचा कट रचण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. या कथित कटात सहभागी असल्याच्या आरोपाखाली आदित्य सूद (वय 52) आणि आशीष मित्तल (वय 37) यांना ऑगस्ट 2024 मध्ये अटक करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान आरोपींच्या वतीने वकिलांनी आरोपी गेल्या दीड वर्षांपासून तुरुंगात असल्याचे आणि तपास जवळपास पूर्ण झाल्याचे निदर्शनास आणून दिले. यानंतर न्यायालयाने जामीन मंजूर केला.

# सीबीएसई कर्मचारी भरती परीक्षेत तोतयागिरीचा पर्दाफाश; एकाला अटक

## औंध येथील परीक्षा केंद्रात गैरप्रकार; केंद्र पर्यवेक्षकांच्या सतर्कतेमुळे फसवणूक उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) कर्मचारी भरती परीक्षेत गैरप्रकार केल्याप्रकरणी पुणे पोलिसांनी एका तरुणाला अटक केली आहे. औंध परिसरातील परीक्षा केंद्रात तोतयागिरी करून परीक्षा देण्याचा प्रयत्न करणाऱ्या राजस्थान येथील तरुणाला केंद्रावरील पर्यवेक्षकांच्या सतर्कतेमुळे रंगेहाथ पकडण्यात आले.

अमित कमलसिंग शर्मा (वय २५, रा. सिधमुख, राजस्थान) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी चतु:शृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहायक पोलीस निरीक्षक नरेंद्र पाटील या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, औंधमधील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत रविवारी सीबीएसईकडून कनिष्ठ लेखापाल तसेच सहाय्यक पदांसाठी भरती परीक्षा आयोजित करण्यात आली होती. परीक्षेदरम्यान केंद्रावरील पर्यवेक्षकांनी संशयाच्या आधारे अमित शर्मा याच्याकडे ओळखपत्राची मागणी केली. ओळखपत्रावरील नाव आणि इतर तपशीलांबाबत विसंगती आढळून आल्याने त्याची अधिक चौकशी करण्यात आली.

चौकशीत अमित शर्मा हा मूळ परीक्षार्थी नसून, तो दुसऱ्याच्या वतीने परीक्षा देत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर त्याला तात्काळ ताब्यात घेऊन चतु:शृंगी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. या घटनेमुळे सीबीएसईच्या कर्मचारी भरती परीक्षेतील सुरक्षाव्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी केंद्र पर्यवेक्षकांनी दाखविलेल्या सतर्कतेमुळे मोठी फसवणूक उघडकीस आली असून, पोलिसांकडून आरोपीकडे अधिक चौकशी सुरू आहे. या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहे का, तसेच तोतयागिरीमागील साखळी उघड होण्याची शक्यता तपास यंत्रणा तपासत आहे.

# 'ड्रंक अँड ड्राईव्ह केल्यास भर चौकात सत्कार!'

## मद्यपी वाहनचालकांना पोलीस आयुक्तांचा कडक इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे शहरात मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या मद्यपी वाहनचालकांविरोधात पोलीस प्रशासनाने आक्रमक भूमिका घेतली असून, सोमवारी शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात तब्बल एक हजार मद्यपी वाहनचालकांना समुपदेशनासाठी बोलावण्यात आले. या वेळी पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी खास कडक शैलीत मद्यपी वाहनचालकांना इशारा देत, "पुन्हा मद्यप्राशन करून वाहन चालविल्यास भर चौकात पोलिसांच्या पद्धतीने 'सत्कार' केला जाईल," असा थेट दम दिला.

शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात रस्ते सुरक्षा मोहिमेअंतर्गत आयोजित या समुपदेशन व मार्गदर्शन शिबिरात 'ड्रंक अँड ड्राईव्ह' प्रकरणी कारवाई झालेल्या वाहनचालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमात पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी उपस्थित वाहनचालकांशी थेट संवाद साधत मद्यप्राशन करून वाहन चालविण्याचे गंभीर परिणाम स्पष्ट केले. यावेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील आणि उपायुक्त हिंमत जाधव हेही उपस्थित होते. पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, "मद्यप्राशन करून वाहन चालविल्यामुळे गंभीर स्वरूपाचे अपघात घडतात. यात अनेक वेळा निष्पाप वाहनचालक, पादचारी आणि त्यांची कुटुंबे विनाकारण उद्ध्वस्त होतात. मद्यपी वाहनचालकांच्या एका चुकीमुळे एखाद्या कुटुंबाचे संपूर्ण आयुष्य बदलून जाते. त्यामुळे मद्यप्राशन करून वाहन चालविणे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही."

पुढे बोलताना त्यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, "पुन्हा असे धारिष्ट्य केल्यास संबंधित मद्यपी वाहनचालकांची छायाचित्रे संकेतस्थळांवर आणि समाज माध्यमांवर प्रसारित केली जातील. ती छायाचित्रे त्यांच्या मित्रमंडळींना व कुटुंबीयांनाही पाठवली जातील. गरज पडल्यास भर चौकात पोलिसांच्या शैलीत खास सत्कारही करण्यात येईल."

### वर्षभरात ६ हजार मद्यपींवर कारवाई

गेल्या एका वर्षात पुणे शहरात मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या सुमारे सहा हजार वाहनचालकांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलीस आयुक्तांनी दिली. "यापुढील काळात ही कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे," असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.

### समाजात जनजागृतीचा संदेश देण्याचे आवाहन

अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील म्हणाले, "या समुपदेशन शिबिराचा उद्देश शिक्षा देणे नसून, वाहतूक नियमांचे पालन न केल्यास होणाऱ्या गंभीर परिणामांची जाणीव करून देणे आहे. भारतात दरवर्षी सुमारे १ लाख ८० हजार नागरिकांचा अपघातात मृत्यू होतो, तर दररोज जवळपास ४०० जण रस्ते अपघातात प्राण गमावतात. ही आकडेवारी अत्यंत चिंताजनक असून वाहनचालकांनी समाजात सुरक्षिततेचा संदेश देणे गरजेचे आहे." शहरातील गंभीर अपघात कमी करण्याचा निर्धार पोलिसांनी केला असून, शहरातील सुमारे ३० टक्के गंभीर अपघात अवजड वाहनांमुळे होत असल्याचेही पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी नमूद केले. त्यामुळे शहराच्या मध्यभागात जड वाहनांना बंदी घालण्यात आली असून, पुढील आठवड्यात अपघात करणाऱ्या अवजड वाहनचालक व वाहनमालकांचे स्वतंत्र समुपदेशन करण्यात येणार आहे.

### दर आठवड्याला समुपदेशन शिबिर

● अशा प्रकारची समुपदेशन शिबिरे दर आठवड्याला घेण्यात येणार असून, भरधाव वेग, एकाच दुचाकीवर तिघांचा प्रवास, विरुद्ध दिशेने वाहन चालविणे अशा गंभीर नियमभंग करणाऱ्यांचे परवाने जप्त करण्यात येणार आहेत. प्रसंगी वाहनेही जप्त केली जातील. समुपदेशन शिबिराला उपस्थित राहणे बंधनकारक असून, त्यानंतरच परवाना परत दिला जाणार आहे.

# सीबीएसई कर्मचारी भरती परीक्षेत तोतयागिरी; एकाला अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) कर्मचारी भरती परीक्षेत तोतयागिरीचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, पुणे पोलिसांनी एका तरुणाला अटक केली आहे. औंध परिसरातील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत रविवारी ही परीक्षा पार पडत असताना हा प्रकार समोर आला.

अमित कमलसिंग शर्मा (वय २५, रा. सिधमुख, राजस्थान) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. सीबीएसईकडून कनिष्ठ लेखापाल व सहाय्यक पदांसाठी ही परीक्षा आयोजित करण्यात आली होती.

परीक्षेदरम्यान केंद्रावरील पर्यवेक्षकांनी संशयाच्या आधारे संबंधित परीक्षार्थीकडे ओळखपत्राची तपासणी केली. ओळखपत्रातील नाव आणि इतर तपशीलांमध्ये तफावत आढळल्याने चौकशी करण्यात आली. चौकशीत अमित शर्मा हा मूळ परीक्षार्थी नसून, दुसऱ्याच्या वतीने परीक्षा देत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर त्याला तात्काळ ताब्यात घेऊन चतु:शृंगी पोलीस ठाण्यात सुपूर्द करण्यात आले. आरोपीविरुद्ध शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक नरेंद्र पाटील करत असून, या तोतयागिरीमागे आणखी कोणी सहभागी आहे का, याचा शोध घेतला जात आहे. केंद्र पर्यवेक्षकांच्या सतर्कतेमुळे मोठी फसवणूक टळल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पाईपलाईनच्या वादातून शेतकऱ्याला मारहाण

**दौंड:** स्वामी चिंचोली (ता. दौंड) येथे रानातील सामाईक पाईपलाईन वापरण्यावरून झालेल्या वादातून एका शेतकऱ्याला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना सोमवारी (ता. 26) सायंकाळी पाच वाजता घडली. देवीदास नामदेव नहाणे (वय 55) हे ज्वारी पिकाची पाहणी करत असताना दिलीप देसाई व नाना सस्ते यांनी त्यांना अडवून शिवीगाळ, दमदाटी करत लाथाबुक्यांनी मारहाण केली. याप्रकरणी दोघांविरुद्ध दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### पुणे पोलिसांचा निवडणूकपूर्वी मोठा ॲक्शन प्लॅन

**पुणे :** पुणे शहरात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांपूर्वी कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी विशेष प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. ३ ते १६ फेब्रुवारी या काळात गुन्हेगारी गौरव करणाऱ्या सोशल मीडिया रील्स, व्हिडिओ व पोस्टवर बंदी असेल. ज्वलनशील पदार्थ, शस्त्रे, नेत्यांचे पुतळे जाळणे व प्रक्षोभक घोषणा यावरही निर्बंध आहेत. नियम मोडल्यास कठोर कारवाई केली जाईल. ७ फेब्रुवारीला मतदान आणि ९ फेब्रुवारीला मतमोजणी होणार असून, पोलिसांची मोहीम सुरक्षित निवडणुकीसाठी सातत्याने सुरू राहणार आहे.

### वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव कुंभार यांचे निधन

**लोणीकंद :** लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव कुंभार (वय ५०) यांचे मध्यरात्री हृदयविकाराने निधन झाले. मुळचे कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील चावरे गावातील कुंभार यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होते. पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार मागे राहिला आहे. ३१ जानेवारी रोजी रात्री अस्वस्थ होऊन त्यांना खराडीतील रुग्णालयात दाखल केले असता हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचे निधन झाले.

---

### अनुभव, विश्वासार्हता आणि प्रशासकीय कौशल्यामुळे पालकमंत्रीपदासाठी प्रबळ दावेदारी

# पुण्याच्या नेतृत्वाची कसोटी : वळसे पाटील नावाभोवती आशेचे वर्तुळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणी :** राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याबाबत घडलेल्या अनपेक्षित घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात चिंता व संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्याच्या राजकीय आणि प्रशासकीय नेतृत्वाची जबाबदारी कोणाकडे जाणार, हा प्रश्न केवळ राजकीय वर्तुळापुरता न राहता सामान्य जनतेतही चर्चेचा विषय ठरला आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या सुनेत्रा पवार यांना पुणे जिल्ह्यात प्रभावी साथ देणारे नेतृत्व कोण असेल, याबाबत राज्यभर ऊहापोह सुरू आहे.

या चर्चेत सर्वाधिक ठळकपणे पुढे येणारे नाव म्हणजे राज्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील. अभ्यासू, संयमी, पारदर्शक आणि प्रशासकीय निर्णयक्षम नेता अशी त्यांची प्रतिमा आजही जनमानसात घट्ट रुजलेली आहे. १९९० पासून पवार कुटुंबाशी असलेली निष्ठा आणि सुमारे ३६ वर्षांचा प्रदीर्घ राजकीय अनुभव यामुळे ते पुणे जिल्ह्याच्या नेतृत्वासाठी सक्षम पर्याय मानले जात आहेत.

सन २००० मध्ये उच्च व तंत्रशिक्षण खात्याची जबाबदारी स्वीकारल्यानंतर वळसे पाटील यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी शिक्षणाची दारे खुली केली. डोनेशनच्या जाळ्यात अडकलेल्या हजारो शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना त्यांनी शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. हा निर्णय आजही दूरदृष्टीचा आणि समाजाभिमुख मानला जातो.

२००६ मध्ये राज्य गंभीर वीजटंचाईच्या संकटात असताना ऊर्जा खात्याची धुरा वळसे पाटील यांच्याकडे आली. आठ ते बारा तासांच्या लोडशेडिंगने त्रस्त झालेल्या शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांसाठी त्यांनी वीज निर्मिती प्रकल्प वाढवले, इतर राज्यांतून वीज उपलब्ध करून दिली आणि प्रत्येक तालुक्यात उपकेंद्रांचे जाळे उभे केले. शेतकऱ्यांसाठी वीज बिल माफीसाठी घेतलेला पुढाकार आजही लोकांच्या स्मरणात आहे. "अंधारातून प्रकाशाकडे" नेणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख याच काळात निर्माण झाली.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात गृहमंत्रीपदाची जबाबदारीही त्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत सांभाळली. पारदर्शक कारभार, प्रशासनावर पकड आणि समन्वय साधण्याची क्षमता यामुळे त्यांनी गृह खात्याचा विश्वास पुन्हा प्रस्थापित केला. याशिवाय विधानसभा अध्यक्ष, वैद्यकीय शिक्षण, कामगार आणि सहकार अशा विविध खात्यांमध्येही त्यांनी आपला ठसा उमटवला आहे.

#### विकासाचा वेग कायम राहील...

● आजच्या घडीला पुणे जिल्ह्यासाठी अधिक निधी, सक्षम प्रशासकीय समन्वय आणि राज्य नेतृत्वाशी सुसंवाद अत्यावश्यक मानला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी असलेले वळसे पाटील यांचे सौहार्दपूर्ण संबंध पाहता, त्यांना कॅबिनेट मंत्री करून पुणे जिल्ह्याची जबाबदारी दिल्यास विकासाचा वेग कायम राहील, अशी भावना महायुतीतील अनेक आमदारांसह सर्वसामान्य जनतेमध्ये व्यक्त होत आहे.

---

# आंबेगाव तालुक्यात मुळा उत्पादक शेतकरी संकटात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ थंडी व बाजारभावाचा दुहेरी फटका

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणावर मुळ्याची लागवड करण्यात आली होती. कमी कालावधीत तयार होणारे पीक, नियमित पाणीपुरवठा आणि बाजारात चांगली मागणी राहील, या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांनी मुळा पिकाकडे वळण घेतले. मात्र सध्या प्रतिकूल हवामान आणि बाजारातील घसरलेले दर यामुळे मुळा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात तीव्र थंडी जाणवत असून त्याचा थेट परिणाम मुळ्याच्या पिकावर झाला आहे. वाढलेल्या थंडीमुळे मुळ्याच्या पिकाला अकाली फुले येण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यामुळे जमिनीत वाढणाऱ्या मुळ्यांची नैसर्गिक वाढ व पोषण प्रक्रिया योग्यरीत्या झाली नाही. परिणामी मुळे अपेक्षित आकाराची व वजनाची न राहता पोकळ, कडू चवीची व बाजारात कमी दर्जाची ठरत आहेत. याच दरम्यान बाजारपेठेत मुळ्याला मिळणारा भावही अत्यंत कमी झाला आहे. उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा बाजारभाव अपुरा असल्याने शेतकऱ्यांचा खर्चही निघणे अवघड झाले आहे. बियाणे, खते, औषधे, मजुरी, पाणीपुरवठा व वाहतूक यावर मोठ्या प्रमाणात खर्च होतो. मात्र बाजारात मुळ्याला मिळणाऱ्या कमी दरामुळे शेतकरी तोट्यात जात असल्याचे चित्र आहे.

शिंगवे गावातील मुळा उत्पादक शेतकरी अमोल शेळके यांनी सांगितले की, "मुळ्याचे पीक चांगले येईल या आशेने मेहनत घेतली. मात्र थंडीमुळे पीक बिघडले आणि बाजारात दरही घसरले. त्यामुळे केलेला खर्चही वसूल होत नाही." काही शेतकऱ्यांनी मुळा काढणी करून बाजारात नेला असता व्यापाऱ्यांकडून अत्यंत कमी दरात खरेदी केली जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

---

# फ्लॉवरचे भाव गडगडले; आंबेगाव तालुक्यातील शेतकरी आर्थिक संकटात

### दहा किलोस अवघे १०० ते १२५ रुपये भाव; उत्पादन खर्चही निघेना

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लाखणगाव, जारकरवाडी, पोंदेवाडी, देवगाव, काठापूर बुद्रूक, निरगुडसर, वाळूंजनगर आदी गावांमध्ये सध्या फ्लॉवर (कोबी) काढणीचे काम जोरात सुरू आहे. मात्र बाजारात फ्लॉवरच्या भावात मोठी घसरण झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. मेहनतीने पिकवलेल्या मालाला योग्य बाजारभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे.

फ्लॉवर लागवडीनंतर साधारण सव्वा महिन्यात तोंडणीस येते. पीक जोमात असल्यास साधारण सात ते आठ तोडे मिळतात. मात्र या संपूर्ण कालावधीत बी-बियाणे, खते, औषधे, पाणी, मजुरी, वाहतूक अशा विविध बाबींवर मोठ्या प्रमाणात खर्च होतो. उत्पादन खर्च जास्त आणि बाजारभाव अत्यंत कमी असल्याने फ्लॉवर उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे.

सध्या बाजारात फ्लॉवरला दहा किलोस केवळ १०० ते १२५ रुपये एवढाच भाव मिळत आहे. हा भाव उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत अपुरा असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. एकीकडे वाढती महागाई, मजुरी दर, औषधांचे वाढलेले दर आणि दुसरीकडे शेतीमालाचे कोसळलेले भाव यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

फक्त फ्लॉवरच नव्हे तर कांदा, बटाटा तसेच इतर भाजीपाला पिकांचेही भाव सध्या गडगडले आहेत. त्यामुळे संपूर्ण भाजीपाला उत्पादक शेतकरी वर्ग चिंतेत आहे. शेतात राबून, वेळ, पैसा आणि मेहनत खर्च करून पिकवलेल्या मालाला जर बाजारात योग्य किंमत मिळत नसेल, तर शेती करायचीच का? असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. "शेतात पिकावलेल्या मालावर झालेला खर्चही जर वसूल होत नसेल, तर शेतकऱ्यांनी करायचे काय?" असा प्रश्न अनेक शेतकरी भावनिक होऊन विचारत आहेत. शासनाने तातडीने बाजारभाव स्थिर करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, हमीभाव लागू करावा किंवा थेट खरेदीची व्यवस्था करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

---

# खामुंडी येथील ज्येष्ठ नागरिक संघाचा वर्धापनदिन उत्साहात

### १७० ज्येष्ठांना उपयुक्त साहित्याचे मोफत वाटप; आरोग्य शिबिर व सत्कार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळेफाटा :** खामुंडी (ता. जुन्नर) येथील ज्येष्ठ नागरिक संघाचा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात व स्नेहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित विविध सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांना गावातील ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते, अशी माहिती संघाचे अध्यक्ष अशोक कुसाळकर यांनी दिली.

वर्धापनदिनानिमित्त संघाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य व दैनंदिन गरजांचा विचार करून उपयुक्त साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. यामध्ये १७० ज्येष्ठ नागरिकांना मान, कंबर, गुडघे व पाठ शेकण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रबरी पिशव्या तसेच प्रत्येकी एक आधाराची काठी देण्यात आली. वयपरत्वे येणाऱ्या शारीरिक अडचणी लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला असल्याचे आयोजकांनी सांगितले.

यावेळी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजनही करण्यात आले. या शिबिरात ज्येष्ठ नागरिकांची प्राथमिक आरोग्य तपासणी करून आवश्यक उपचार व औषधांचे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक ज्येष्ठांना मोठा दिलासा मिळाला. तसेच संघाच्या वतीने ३२ ज्येष्ठ नागरिकांचे वाढदिवस साजरे करून त्यांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. या उपक्रमाचे उपस्थित ज्येष्ठांनी विशेष स्वागत करून समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ओतूर येथील लायन्स क्लबचे अध्यक्ष संतोष बोडके होते. प्रमुख पाहुणे म्हणून एकनाथ डोंगरे व भिवा माळवे यांनी उपस्थिती लावली. यावेळी मान्यवरांनी मार्गदर्शन करताना ज्येष्ठ नागरिकांचा अनुभव समाजासाठी मौल्यवान असून, त्यांच्या ज्ञानाचा योग्य वापर केल्यास सामाजिक विकासाला चालना मिळू शकते, असे प्रतिपादन केले. संघाच्या सामाजिक, आरोग्यविषयक व सांस्कृतिक उपक्रमांचा आढावा यावेळी घेण्यात आला. याप्रसंगी गणेश डुंबरे, मिलिंद भोर व कैलास बोडके यांना संघासाठी केलेल्या विशेष कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघातील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने करण्यात आली. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केले. संपूर्ण वर्धापनदिनाचा कार्यक्रम आपुलकीच्या वातावरणात, आनंद व उत्साहात पार पडला.

---

# आवटे महाविद्यालयाच्या इतिहास विभागाची बाबू गेनू सैद यांच्या जन्मस्थळी शैक्षणिक क्षेत्रभेट

### महाळुंगे पडवळ येथे स्मारकास भेट; विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यलढ्याचा प्रत्यक्ष अनुभव

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** रयत शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रभेटीच्या माध्यमातून थोर स्वातंत्र्यसैनिक बाबू गेनू सैद यांच्या महाळुंगे पडवळ (ता. आंबेगाव) येथील जन्मस्थळ व स्मारकास भेट दिली. विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास प्रत्यक्ष स्थळी जाऊन समजावा, या उद्देशाने या अभ्यासपूर्ण क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमाचे नियोजन इतिहास विभागाचे विभागप्रमुख प्रा. रविंद्र पारधी, प्रा. राहुल सरोदे आणि डॉ. सचिन पारधी यांनी केले. इतिहास विषयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने या क्षेत्रभेटीत सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी बाबू गेनू सैद यांच्या जीवनकार्याचा, त्यांच्या देशभक्तीचा आणि स्वातंत्र्यलढ्यातील मोलाच्या योगदानाचा अभ्यास केला. यावेळी स्थानिक ग्रामस्थ बाबाजी चासकर यांनी बाबू गेनू सैद यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना विद्यार्थ्यांसमोर उलगडून सांगितल्या. ब्रिटिश सत्तेविरोधातील आंदोलनात त्यांनी दिलेले बलिदान, परकीय मालावर बहिष्कारासाठी केलेले आंदोलन आणि त्यामागील सामाजिक व राष्ट्रीय जाणीव याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. बाबू गेनू सैद यांच्या त्यागामुळेच ते स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरल्याचे त्यांनी नमूद केले. या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील माहितीपुरता इतिहास न राहता तो प्रत्यक्ष अनुभवता आला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना, इतिहासाबद्दलची जाणीव तसेच संशोधनाची आवड निर्माण होते, असे मत उपस्थित प्राध्यापकांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. राहुल सरोदे यांनी सर्व विद्यार्थी, मार्गदर्शक प्राध्यापक आणि सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांचे आभार मानून क्षेत्रभेटीची सांगता केली.

---

### लोणावळ्यात पोलिसांची कडक कारवाई; बुलेट व गाड्यांवर दंड

**लोणावळा :** सुट्टीच्या दिवसांत लोणावळ्यात गर्दीच्या पार्श्वभूमीवर शहर वाहतूक पोलिसांनी कर्कश आवाज करणाऱ्या बुलेट, फॅन्सी नंबर प्लेट व काळ्या काच असलेल्या वाहनांवर विशेष कारवाई केली. शहरात प्रवेश करणाऱ्या व फिरणाऱ्या ९८ वाहनांवर थेट कारवाई करत सुमारे २.१५ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

पोलिसांनी कोणतीही तडजोड न करता नियम मोडणाऱ्यांना इशारा दिला. पर्यटकांचे शहर असलेल्या लोणावळ्यात या कारवाईमुळे नागरिकांना त्रास कमी झाला असून, पुढील काळातही अशीच सतत कारवाई सुरू राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

---

# वीजपंप सुरू करताना विजेचा धक्का; घोडनदी काठावर तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

### वडगाव काशिंबेग परिसरात हळहळ; पिंगळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** वीजपंप सुरू करण्यासाठी घोडनदी काठावर गेलेल्या तरुणाचा वीज वाहक खांबाच्या तारेला विजेचा धक्का बसून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना रविवारी (ता. ...) सकाळी ११ वाजताच्या सुमारास श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग येथील घोडनदी परिसरात घडली. चंद्रकांत मारुती पिंगळे (वय ३४) असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

श्री कुलस्वामी पतसंस्थेत कर्मचारी म्हणून कार्यरत असलेले चंद्रकांत पिंगळे हे स्वतःची शेतीही कसत होते. पिंगळेमळा येथील शेतासाठी त्यांनी घोडनदीवरून वीजपंपाद्वारे पाणीपुरवठ्याची सोय केली होती. रविवारी सुट्टी असल्याने सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास ते वीजपंप सुरू करण्यासाठी नदीकाठावर गेले होते. त्यावेळी परिसरात इतर शेतकरीही उपस्थित होते. वीजपंप सुरू करत असताना नदीकाठावरील वीज वाहक खांबाच्या तारेला विद्युत प्रवाह आल्याने चंद्रकांत पिंगळे यांना जोरदार विजेचा धक्का बसला. धक्क्यामुळे ते घोडनदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यातील पाण्यात फेकले गेले. आरडाओरड ऐकून आजूबाजूचे शेतकरी तातडीने घटनास्थळी धावले. फोनद्वारे मदत मागवण्यात आली. पोलीस पाटील निखिल तारू, श्रीराम डोके, वैभव चव्हाण, शरद लोखंडे, किशोर टेके, संजय काळे, महेश डोके, बाळासाहेब शिंदे आदींनी तत्काळ धाव घेऊन चंद्रकांत पिंगळे यांना पाण्याबाहेर काढले. रुग्णवाहिकेतून त्यांना मंचर उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. चंद्रकांत पिंगळे हे कुटुंबाचा आधारस्तंभ होते.

---

### 'सदानंदाचा येळकोट'च्या जयघोषात पारंपरिक वाद्यांच्या गजरात पंचक्रोशीतील मानकऱ्यांचा सहभाग

# धामणीतील श्री म्हाळसाकांत खंडोबाच्या मानाच्या काठीचा सोहळा उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** धामणी (ता. आंबेगाव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबाच्या माही पुनवेच्या यात्रेच्या दुसऱ्या दिवशी सोमवारी (दि. ०२) पंचक्रोशीतील मानाच्या काठीचा पारंपरिक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. पारंपरिक वाद्यांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी, भंडाऱ्याची मुक्त उधळण आणि "सदानंदाचा येळकोट"च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

या सोहळ्यात पंचक्रोशीतील मानाच्या काठीचे मानकरी असलेल्या विविध परंपरागत कुळांनी आपला सहभाग नोंदवला. अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) येथील समस्त राजगुरू मंडळी, सविंदणे (ता. शिरूर) येथील पंचरास मंडळी, कवठे यमाई येथील कांदळकर, वाळूंजनगर (लोणी) येथील वाळूंज पाटील, पाबळ येथील आगरकर, तळेगाव ढमढेरे येथील नरके, धामणी-लोणी येथील पंचरास मंडळी, येडगाव (ता. जुन्नर) येथील आल्हाट आणि हाजी टाकळी येथील घोडे मंडळी या मानकऱ्यांनी परंपरेनुसार मानाच्या काठ्यांची मिरवणूक काढली.

आजच्या गतीमान आणि आधुनिक युगातही अनेक कुटुंबे बैलगाड्या जुंपून, तर काही मानाची काठी खांद्यावर घेऊन पायी दरमजल प्रवास करत धामणीला येतात, ही बाब या यात्रेचे वैशिष्ट्य ठरली. रंगीबेरंगी कापडांनी सजविलेल्या आणि टोकाला मोरपिस लावलेल्या काठ्या भाविकांचे विशेष आकर्षण ठरल्या.

सकाळी आठ वाजता मिरवणुकीला सुरुवात झाली. पहिला मान अवसरी खुर्द येथील समस्त राजगुरू मंडळींच्या काठीला देण्यात आला. वाजतगाजत काठी मल्हार महाद्वारावरील देवाच्या अश्वशिल्पाला टेकविल्यानंतर मोठ्या जयघोषात सोहळा पार पडला. मिरवणुकीत महिला भाविकांचा सहभाग लक्षणीय असून सर्व भाविक पिवळ्याधमक भंडाऱ्याने न्हालेल्या अवस्थेत दिसत होते. खंडोबा देवस्थान आणि ग्रामस्थांच्या वतीने देवस्थान जिर्णोद्धार समितीचे अध्यक्ष प्रकाश जाधव पाटील, तसेच सेवेकरी दादाभाऊ भगत, सुभाष तांबे, प्रभाकर भगत, धोंडीबा भगत, शांताराम भगत, पांडुरंग भगत, नामदेव भगत, सीताराम वाघे, ज्ञानेश्वर वाघे व सुरेश पवार यांनी मानकऱ्यांचा मानाचा फेटा व पानफूल देऊन सत्कार केला. शांततेत आणि भक्तिभावात पार पडलेला हा मानाच्या काठीचा सोहळा पंचक्रोशीतील भाविकांसाठी श्रद्धा व परंपरेचे प्रतीक ठरला.

---

# उरुळी कांचन येथे रेल्वे रुळावर युवकाचा मृतदेह आढळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**उरुळी कांचन :** उरुळी कांचन परिसरातील रेल्वे रुळावर एका 19 वर्षीय युवकाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. उरुळी कांचन गावाच्या हद्दीतील OHE पोल क्रमांक 219/1 ते 2 दरम्यान, तारांगण नक्षत्र बी बिल्डिंगच्या पाठीमागील बाजूस सोमवारी (दि. 02) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास ही घटना उघडकीस आली.

दिनेश संजय कोरडे (वय 19, रा. तळवाडी चौक, उरुळी कांचन, ता. हवेली) असे मृत युवकाचे नाव आहे. या प्रकरणी लोणी काळभोर येथील रेल्वे पोलीस हवालदार राजेंद्र नारायण कांबळे यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रेल्वे रुळावर मृतदेह पडल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पाहणीत युवकाचे डोके धडापासून पूर्णपणे वेगळे होऊन रेल्वे पटरीवर पडलेले आढळून आले, तर उर्वरित धड रुळाच्या दक्षिण बाजूस होते. घटनास्थळी कस्तुरी रुग्णवाहिकेच्या मदतीने मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्र, उरुळी कांचन येथे नेण्यात आला. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती युवकाचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

हा रेल्वे अपघात आहे की आत्महत्येचा प्रकार, याबाबत अद्याप स्पष्टता नसून उरुळी कांचन पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## सारांश वृत्त

### अनंतनागमध्ये ड्रग्ज तस्कराला अटक

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यात पोलिसांनी सोमवारी एका कथित ड्रग्ज तस्कराला अटक केली आणि त्याच्या ताब्यातून सुमारे ३३० ग्रॅम बेकायदेशीर पदार्थ जप्त केला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. "अनंतनागमधील नागदंडी क्रॉसिंगवर तपासणी दरम्यान, सोमब्रुना येथील रहिवासी इशफाक अहमद मलिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीला अटक करण्यात आली. झडती दरम्यान, त्याच्या ताब्यातून अंदाजे ३३० ग्रॅम वजनाचा चूर्ण चरससारखा पदार्थ जप्त करण्यात आला," असे पोलिस प्रवक्त्याने सांगितले.

### कर्नाटक सरकारचा उर्दू शाळांच्या वेळेत

**बेंगळुरू :** कर्नाटक सरकारने रमजान महिन्यात राज्यातील उर्दू माध्यमाच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या कामकाजाच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. गृहमंत्री जी परमेश्वर यांनी म्हटले की, सरकारच्या या निर्णयाला अल्पसंख्याकांचे तुष्टीकरण म्हणणे योग्य नाही. हा निर्णय सर्व सरकारी, अनुदानित आणि विनाअनुदानित उर्दू माध्यमांच्या शाळांना लागू आहे. आदेशांचा आढावा आणि कर्नाटक राज्य प्राथमिक शाळा शिक्षण संघटना (आर), बेंगळुरू यांनी सादर केलेल्या निवेदनानंतर घेतला आहे.

### आठ घुसखोरांना बांगलादेशात पाठवले

**गुवाहाटी :** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा यांनी सांगितले की, कछार जिल्ह्यातून आठ घुसखोरांना शेजारच्या बांगलादेशला परत पाठवण्यात आले आहे. प्रत्येक बेकायदेशीर स्थलांतरिताची ओळख पटवून त्यांना त्यांच्या देशात पाठवले जाईल, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. कोणत्याही बेकायदेशीर घुसखोराला सोडले जाणार नाही; प्रत्येकाला आपल्या सुरक्षा एजन्सींच्या रोषाला सामोरे जावे लागेल आणि त्यांना त्यांच्या देशात निर्दयपणे परत पाठवावे लागेल.

### ७-८ टक्के वाढीवर भर - निर्मला सीतारामन

# आर्थिक दर राखण्याला सर्वोच्च प्राधान्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशाचा ७ ते ८ टक्के आर्थिक विकासदर टिकवून ठेवणे हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असून, त्यातून सर्वसामान्य नागरिकांना फायदा होईल आणि अधिक रोजगारनिर्मिती होईल, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्पष्ट केले.



केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ सादर केल्यानंतर रविवारी देशातील विविध भागांतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. मजबूत आर्थिक वाढ झाल्यास तिचे लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचतात, असे त्यांनी नमूद केले.

"विकास हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. जगातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून भारताने आपली स्थिती टिकवून ठेवली पाहिजे. त्यासाठी आपल्याला ७ टक्के, ८ टक्के विकासदरावर राहणे गरजेचे आहे. माझे प्रत्येक पाऊल ही वाढ कायम ठेवण्यासाठीच असेल," असे सीतारामन म्हणाल्या. आर्थिक विकासामुळे रोजगारनिर्मिती होते, अधिक लोक कामाच्या प्रवाहात सामील होतात आणि एकूण उत्पादकता वाढते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महिलांच्या सहभागाबाबत बोलताना सीतारामन म्हणाल्या की, महिलांची कार्यक्षमता आणि अचूकता यामुळे कामगार क्षेत्रातील त्यांचे योगदान नियोक्त्यांकडून अधिकाधिक ओळखले जात आहे. अर्ध-कुशल क्षेत्रांमध्ये महिलांची संख्या वाढत असल्याचे त्याचे उदाहरण आहे. मात्र, उद्योगांच्या बोर्डरूममध्ये महिलांचे प्रतिनिधित्व अद्याप मर्यादित असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. निर्णयप्रक्रियेवर प्रभाव टाकण्यासाठी आणि इतरांसाठी आदर्श निर्माण करण्यासाठी अधिक महिलांनी नेतृत्वाच्या पदांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. काही प्रमाणात प्रगती झाली असली, तरी अजून बरेच काही करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना 'ऑरेंज इकॉनॉमी'बाबतही माहिती दिली. ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स या क्षेत्रांसाठी सरकारने गेल्या अर्थसंकल्पापासून धोरणात्मक पाठबळ, निधी आणि समर्थन सातत्याने उपलब्ध करून दिल्याचे त्या म्हणाल्या.

"आज टेलिव्हिजन माध्यमेदेखील सर्जनशील सामग्रीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत. हे क्षेत्र अत्यंत उज्ज्वल असून येथे अनेक संधी उपलब्ध आहेत. सर्जनशीलतेला दररोज आव्हान दिले जाते. क्षमता असल्यास हे क्षेत्र नक्कीच करिअरसाठी उपयुक्त ठरू शकते," असे सीतारामन म्हणाल्या.

अर्थसंकल्प तयार करण्याच्या प्रक्रियेबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, अर्थसंकल्पाची तयारी साधारणपणे ऑक्टोबरच्या अखेरीस किंवा नोव्हेंबरमध्ये सुरू होते. या प्रक्रियेत उद्योग संघटना, व्यावसायिक, अर्थतज्ज्ञ, कामगार संघटना आणि विविध हितसंबंधी गटांशी चर्चा केली जाते. सोशल मीडियाद्वारेही नागरिकांकडून सूचना मागवण्यात येतात. प्राप्त सूचनांची छाननी करून संबंधित मंत्रालये आणि राज्य सरकारांशी चर्चा केली जाते. व्यवहार्यता आणि अंमलबजावणीच्या दृष्टीने त्यात आवश्यक बदल केले जातात. अनेक टप्प्यांतील आढावा आणि मसुद्यानंतर अखेर अर्थसंकल्पीय भाषण अंतिम केले जाते, असे अर्थमंत्र्यांनी सांगितले.

# केंद्राच्या थकबाकीवरून तृणमूलचा सभात्याग

### बंगालचे २ लाख कोटी रुपये देणे बाकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** तृणमूल काँग्रेसने सोमवारी पुन्हा एकदा पश्चिम बंगालला केंद्र सरकारकडून देय असलेल्या थकबाकीचा मुद्दा उपस्थित करत राज्यसभेतून सभात्याग केला. सभागृहाचे कामकाज सुरू झाल्यानंतर लगेचच तृणमूलच्या खासदारांनी हा निर्णय घेतला.

सभात्यागानंतर माध्यमांशी बोलताना, राज्यसभेतील तृणमूल काँग्रेसच्या उपनेत्या सागरिका घोष यांनी केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले. त्यांनी सांगितले की, केंद्राकडून पश्चिम बंगालचे सुमारे २ लाख कोटी रुपये अजूनही थकलेले आहेत.


"आज राज्यसभेत अखिल भारतीय तृणमूल काँग्रेसने सभात्याग केला, कारण अर्थसंकल्पात एकदाही बंगालचा उल्लेख करण्यात आलेला नाही आणि राज्याची देणी अद्याप अडकून पडली आहेत. बंगालचे २ लाख कोटी रुपये केंद्राकडे बाकी आहेत," असे घोष यांनी सांगितले. हा प्रकार संघराज्य रचनेच्या विरोधात असल्याचा आरोप करत त्यांनी म्हटले की, "हे संघराज्य व्यवस्थेचे उल्लंघन आहे, केंद्र-राज्य संबंधांचे उल्लंघन आहे आणि थेट संविधानाचे उल्लंघन आहे." घोष यांनी सांगितले की, रविवारी सादर करण्यात आलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात पश्चिम बंगालकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. "अर्थसंकल्पात ज्या पद्धतीने बंगालला डावलण्यात आले, त्यामुळेच आज आम्ही संसदेत हा मुद्दा उपस्थित केला आणि सभात्याग केला," असे त्या म्हणाल्या.

गेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपला पश्चिम बंगालमध्ये पराभव पत्करावा लागल्यानंतर केंद्र सरकारने राज्याविरोधात सूडबुद्धीने वागणूक दिल्याचा दावा तृणमूल काँग्रेसने केला आहे.

# काश्मीर खोऱ्यात ४.७ तीव्रतेचा भूकंप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** सोमवारी पहाटे काश्मीर खोऱ्यात ४.७ तीव्रतेचा भूकंप झाला. या भूकंपामुळे बारामुल्ला जिल्ह्यातील पट्टण आणि आसपासच्या परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मात्र, आतापर्यंत कोणत्याही प्रकारची जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याचे वृत्त नाही.



राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या माहितीनुसार, हा भूकंप पहाटे ५ वाजून ३५ मिनिटांनी झाला. भूकंपाचा केंद्रबिंदू पट्टण परिसरात असून जमिनीखाली सुमारे १० किलोमीटर खोलीवर ही हालचाल नोंदवण्यात आली. हा भाग प्रसिद्ध पर्यटनस्थळ गुलमर्गच्या सुमारे १० किलोमीटर ईशान्येला आहे.

प्रारंभी भूकंपाची तीव्रता ४.६ असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, पुढील मोजमापानंतर ती ४.७ इतकी निश्चित करण्यात आली. भूकंपाचे धक्के सुमारे २० सेकंदांपर्यंत जाणवले. पहाटेची वेळ असल्याने अनेक नागरिक झोपेत असतानाच हे हादरे बसले. अचानक झालेल्या कंपनांमुळे काही ठिकाणी लोक घराबाहेर धावले, तर काही भागांत घबराटीचे वातावरण निर्माण झाले.

तज्ज्ञांच्या मते, काश्मीर खोरे हे अत्यंत सक्रिय भूकंपप्रवण क्षेत्रात येते. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये भारतीय मानक ब्युरोने प्रसिद्ध केलेल्या राष्ट्रीय भूकंपीय धोक्याच्या नकाशात काश्मीरसह संपूर्ण हिमालयीन पट्टा सिस्मिक झोन सहा मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे, जो उच्च धोका दर्शवतो.

# त्या पुस्तकाचा उल्लेख करताच संसदेत गोंधळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** २०२० मधील भारत-चीन सीमा संघर्षावर लोकसभेत बोलताना माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित स्मरणग्रंथाचा उल्लेख केल्यामुळे सोमवारी संसदेतील वातावरण तापले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना मुद्दा मांडण्यापासून रोखण्यात आल्याचा आरोप करत काँग्रेसने मोदी सरकारवर जोरदार टीका केली आहे.



काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी म्हटले की, सरकारला आपल्या अपयशाचे सत्य उघड होईल, या भीतीने राहुल गांधी यांचे भाषण दाबण्याचा प्रयत्न करण्यात आला. यासाठी नियमांचा गैरवापर करत सर्वात वरिष्ठ कॅबिनेट मंत्र्यांना पुढे करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला.

वेणुगोपाल यांनी सोशल मीडियावर लिहिले की, "हे बनावट राष्ट्रवादी सरकार इतके घाबरले आहे की, विरोधी पक्षनेत्यांना सभागृहात गप्प करण्यासाठी त्यांनी पूर्ण ताकद लावली. माजी लष्करप्रमुखांच्या पुस्तकातील उतारे सरकारच्या तथाकथित राष्ट्रवादी भूमिकेचा पर्दाफाश करतात, म्हणूनच राहुल गांधींना बोलू दिले जात नाही." त्यांनी आरोप केला की, कार्यपद्धतीच्या नियमांचा चुकीचा अर्थ लावून सरकार भारतीय जनतेला चीनसोबतच्या संघर्षातील हिमालयीन चुकांबाबत जाणून घेण्यापासून वंचित ठेवत आहे. "हे मतभेद दाबण्याचे आणि विरोधकांना शांत करण्याचे एक ठरावीक, फॅसिस्ट पद्धतीचे उदाहरण आहे," असेही वेणुगोपाल म्हणाले.

सोमवारी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर चर्चा सुरू असताना राहुल गांधी बोलण्यासाठी उभे राहिले. यावेळी त्यांनी भाजप खासदार तेजस्वी सूर्या यांनी काँग्रेसवर केलेल्या राष्ट्रवादाच्या आरोपांना उत्तर देण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी त्यांनी २०२० च्या भारत-चीन संघर्षाबाबत जनरल नरवणे यांच्या अप्रकाशित स्मरणग्रंथातील उताऱ्यांचा उल्लेख सुरू केला. मात्र, संरक्षण मंत्री राजनाथसिंह आणि अन्य सत्ताधारी सदस्यांनी याला तीव्र विरोध केला. नरवणे यांचे पुस्तक प्रकाशित झाले आहे की नाही, हे आधी स्पष्ट करावे, अशी मागणी करत राहुल गांधी सभागृहाची दिशाभूल करत असल्याचा आरोप करण्यात आला. या मुद्द्यावरून सभागृहात जोरदार गदारोळ झाला.

# सिंधू पाणी करारावर भारताचा ठाम नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सिंधू पाणी करारासंदर्भात पाकिस्तानकडून सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय कायदेशीर हालचालींना भारताने ठाम प्रत्युत्तर दिले आहे. या प्रकरणात आंतरराष्ट्रीय लवाद न्यायालयाच्या निर्णयांचे पालन करण्यास भारताने स्पष्ट नकार दिला असून, हे लवाद न्यायालय बेकायदेशीरपणे स्थापन करण्यात आल्याचा भारताचा दावा आहे.



हेग येथील आंतरराष्ट्रीय लवाद न्यायालयाने भारताला बागलिहार आणि किशनगंगा या जलविद्युत प्रकल्पांच्या ऑपरेशनल नोंदी, विशेषतः तलावांचे लॉगबुक, पुढील सुनावणीसाठी सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाने ही कागदपत्रे ९ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करण्याचे किंवा तसे न केल्यास त्याबाबत औपचारिक स्पष्टीकरण देण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, भारताने या संपूर्ण कार्यवाहीची वैधताच नाकारली आहे. भारताचे म्हणणे आहे की सिंधू पाणी कराराच्या चौकटीत स्थापन झालेले तथाकथित लवाद न्यायालय कायदेशीर नाही आणि त्यामुळे त्याच्या कोणत्याही आदेशांना मान्यता दिली जाणार नाही. त्यामुळे भारत या प्रक्रियेत सहभागी होणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. लवाद न्यायालयाने गेल्या आठवड्यात जारी केलेल्या आदेशानुसार, गुणवत्तेच्या सुनावणीच्या दुसऱ्या टप्प्यात भारतीय जलविद्युत प्रकल्पांशी संबंधित दस्तऐवज सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच २ आणि ३ फेब्रुवारी रोजी हेगमधील पीस पॅलेसमध्ये सुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे. या सुनावणीसाठी भारताने कोणतेही प्रति-स्मारक दाखल केलेले नाही किंवा सहभाग दर्शवलेला नाही, याचीही न्यायालयाने नोंद घेतली आहे.

### प्रकल्पासाठी दूर जाणे भारतासाठी धोक्याचे

# चाबहारसाठी तरतूद नसल्याने चिंता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताच्या सर्वसाधारण अर्थसंकल्पात चाबहार बंदर प्रकल्पासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. गेल्या काही वर्षांत प्रथमच या महत्त्वाच्या सामरिक प्रकल्पासाठी अर्थसंकल्पीय निधी न दिल्याने परराष्ट्र व सामरिक व्यवहार तज्ज्ञ ब्रह्मा चेल्लानी यांनी चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी इंस्टाग्रामवरील एका सविस्तर पोस्टद्वारे या निर्णयावर तीव्र आक्षेप नोंदवला आहे.



चेल्लानी यांनी नमूद केले की चाबहार बंदर हा भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग असून, त्याद्वारे पाकिस्तानमार्गे न जाता अफगाणिस्तान आणि मध्य आशियाशी थेट संपर्क साधता येतो. अशा परिस्थितीत या प्रकल्पापासून दूर राहणे किंवा निधी न देणे हे धोरणात्मकदृष्ट्या अयोग्य ठरेल, असा इशारा त्यांनी दिला.

त्यांनी असेही सांगितले की, अमेरिकेने भारताला २६ एप्रिलपर्यंत या प्रकल्पातून माघार घेण्याचा इशारा दिला होता आणि अन्यथा निर्बंधांचा सामना करावा लागेल, असे सूचित केले होते. चेल्लानी यांच्या मते, चाबहारसाठी निधी थांबवण्याचा निर्णय चुकीचा असून, यामुळे चीनला या भागात आपले स्थान बळकट करण्याची संधी मिळू शकते. चीन आधीच पाकिस्तानमधील ग्वादर बंदरात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत असून, तो चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरचा भाग आहे.

भारताने चाबहारमधून माघार घेतल्यास चीन तेथे आपले अस्तित्व निर्माण करू शकतो, असा इशारा चेल्लानी यांनी दिला आहे. ते म्हणतात की चाबहारच्या शाहिद बेहेश्ती टर्मिनलच्या विकासासाठी भारताने आधीच १२० दशलक्ष डॉलर्स हस्तांतरित केले आहेत. त्यामुळे नव्या अर्थसंकल्पीय तरतुदीची तातडीची गरज नसली तरी, प्रकल्पाकडे दुर्लक्ष होणे ही चिंतेची बाब आहे. तसेच, नवी दिल्ली चाबहारच्या मुद्द्यावर वॉशिंग्टनशी तोडगा काढण्याचा प्रयत्न करत असल्याचे वृत्तही त्यांनी नमूद केले.

चेल्लानी यांनी लक्ष वेधले की ट्रम्प प्रशासनाने गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये २०१८ मध्ये भारताला दिलेली चाबहारसंबंधी निर्बंध सवलत कोणतेही स्पष्ट कारण न देता मागे घेतली होती, ज्यामुळे भारतावर दबाव वाढला आहे.

याच अनुषंगाने नॉर्थ-साऊथ ट्रान्सपोर्ट कॉरिडॉरवरही काम सुरू आहे आणि चाबहार बंदर हे त्याचे केंद्र मानले जाते. त्यामुळे अर्थसंकल्पात चाबहारसाठी कोणतीही तरतूद नसल्याची बातमी समोर येताच राजकीय आणि सामरिक वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

# मणिपूरमध्ये एनडीए सरकार स्थापनेवर चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने बोलावल्यानंतर मणिपूरमधील एनडीएचे आमदार राष्ट्रीय राजधानीत दाखल झाले आहेत. ईशान्येकडील राज्यात लोकप्रिय सरकार स्थापन करण्याच्या शक्यतेवर चर्चा करण्यासाठी हे आमदार दिल्लीत आले असून, सध्याच्या राष्ट्रपती राजवटीचा कालावधी पुढील आठवड्यात संपत आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी संध्याकाळी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांसोबत होणाऱ्या बैठकीत मणिपूरमधील सध्याच्या राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला जाणार आहे. रविवारी रात्री सुमारे २० आमदार दिल्लीत पोहोचले, तर उर्वरित आमदार सोमवारी पक्ष नेतृत्वाच्या निर्देशानुसार राजधानीत दाखल झाले. पुढील काही दिवसांत पक्षाच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन करायचे की नाही, यावर निर्णय होण्याची शक्यता आहे.

मेइतेई आणि कुकी समुदायांमधील वांशिक हिंसाचारानंतर १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सहा महिन्यांसाठी लागू करण्यात आलेल्या राष्ट्रपती राजवटीच्या दुसऱ्या टप्प्याची मुदत संपण्याच्या पार्श्वभूमीवर ही बैठक होत आहे. त्यानंतर ऑगस्ट २०२५ मध्ये राष्ट्रपती राजवट आणखी सहा महिन्यांसाठी वाढवण्यात आली होती. दिल्लीमध्ये पोहोचलेल्या नेत्यांमध्ये माजी मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग, विधानसभा अध्यक्ष सत्यब्रत सिंग, माजी मंत्री वाय. खेमचंद सिंग यांचा समावेश आहे. भाजपच्या प्रदेशाध्यक्षा ए. शारदा देवीही राजधानीत उपस्थित आहेत.

९ फेब्रुवारी रोजी बिरेन सिंग यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने राजीनामा दिल्यानंतर मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. २०२७ पर्यंत कार्यकाळ असलेली ६० सदस्यीय राज्य विधानसभा सध्या निलंबित अवस्थेत आहे. गेल्या काही महिन्यांत भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने मेतेई आणि कुकी समुदायांतील आमदारांसह मित्रपक्ष एनपीएफ, एनपीपी आणि काही अपक्ष आमदारांशी वेगवेगळ्या टप्प्यांत चर्चा केली आहे. सरकार स्थापनेसाठी राजकीय परिस्थिती अनुकूल आहे का, याचा अंदाज घेण्यासाठी या बैठका घेण्यात आल्या.

### शेख हसीनांना १० वर्षांची शिक्षा सुनावली

**ढाका :** बांगलादेशाच्या एका न्यायालयाने शेख हसीना यांना सरकारी गृहनिर्माण प्रकल्पातील जमीन वाटपात अनियमितता झाल्याच्या दोन वेगवेगळ्या भ्रष्टाचार प्रकरणांमध्ये १० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. ढाका विशेष न्यायाधीश न्यायालय-४ चे न्यायाधीश रबिउल आलम यांनी हा निकाल दिला आणि हसीनाला एकूण १० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली - प्रत्येक प्रकरणात पाच वर्षे, असे सरकारी बीएसएस वृत्तसंस्थेने वृत्त दिले आहे.

# सरकारी बँकातील विदेशी गुंतवणूक वाढणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सरकारी बँकांमधील थेट विदेशी गुंतवणुकीची मर्यादा २० वरून ४९ टक्क्यांवर वाढवण्यात येणार आहे. सरकारने त्यासाठी आंतरमंत्रालयीन पातळीवर चर्चा सुरू असल्याची माहिती वित्त सचिव एम. नागराजू यांनी दिली.

वित्त मंत्रालय गेल्या काही महिन्यांपासून भारतीय रिझर्व्ह बँकेशी याबाबत चर्चा करत आहे. अद्याप प्रस्ताव अंतिम झालेला नसल्याची माहिती याविषयाशी संबंधित अधिकाऱ्यांनी माध्यमांना दिली. रॉयटर्सने याबाबतचे वृत्त दिले आहे. विदेशी गुंतवणूकदार भारतीय बँकांमध्ये गुंतवणूक करण्यात रस दाखवत आहे.

दुबईतील एमिरेट्स एनबीडीने आरबीएल बँकेत ३ अब्ज डॉलरची गुंतवणूक करत ६० टक्के हिस्सा ताब्यात घेतला आहे. कोणतीही विदेशी गुंतवणूक संस्था खासगी बँकेतील १५ टक्के हिस्सा थेट खरेदी करू शकते. तर, जास्तीत जास्त ७४ टक्के हिस्सा खरेदी करता येतो. मात्र, त्यासाठी आरबीआयच्या परवानगीची आवश्यकता असते.

सरकारी मालकीच्या बँकांमध्ये विदेशी संस्थांना गुंतवणूक करण्याची मोकळीक देण्याचा सरकार विचार करत आहे. सध्याच्या मर्यादेपेक्षा दुपटीहून अधिक विदेशी गुंतवणूक सहज करता यावी असा विचार सरकारी पातळीवर सुरू असल्याचे नागराजू म्हणाले.

### केंद्र सरकारसह १२ राज्यांकडून उत्तर मागितले

# धर्मांतरविरोधी कायद्यांना सर्वोच्च न्यायालयाची नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशातील विविध राज्यांनी लागू केलेल्या धर्मांतरविरोधी कायद्यांच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या नव्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्र सरकार आणि राजस्थान व अरुणाचल प्रदेशसह एकूण १२ राज्यांकडून उत्तर मागितले आहे. भारतातील राष्ट्रीय चर्च परिषदेनं (एनसीसीआय) ही याचिका दाखल केली आहे.



सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची दखल घेत चार आठवड्यांच्या आत केंद्र व संबंधित राज्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, असे निर्देश दिले. तसेच या नव्या याचिकांना यापूर्वी प्रलंबित असलेल्या तत्सम याचिकांसोबत जोडण्याचे आदेश देत, तिन्ही न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर एकत्रित सुनावणी होणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. वरिष्ठ अधिवक्ता मीनाक्षी अरोरा यांच्या माध्यमातून एनसीसीआयने सादर केलेल्या याचिकेत या कायद्यांच्या अंमलबजावणीला तात्काळ स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली आहे. काही राज्यांतील कायदे तथाकथित जबरदस्तीच्या धर्मांतराविरोधात 'दक्षता गटां'ना तक्रारी दाखल करण्यास प्रोत्साहन देतात, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर गैरवापर होत असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे.

केंद्र सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, अशाच स्वरूपाच्या अनेक याचिका आधीच सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत आणि केंद्राचे उत्तर तयार असून लवकरच दाखल करण्यात येईल. त्यांनी याचिकाकर्त्यांच्या काही दाव्यांना विरोधही केला.

या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने केंद्रासह राजस्थान, उत्तर प्रदेश, ओडिशा, छत्तीसगड, अरुणाचल प्रदेश, गुजरात, झारखंड, उत्तराखंड, हरियाणा, मध्य प्रदेश, कर्नाटक आणि हिमाचल प्रदेश या राज्यांना नोटीस बजावली आहे. यापूर्वी १६ सप्टेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने अशाच प्रलंबित याचिकांवर संबंधित राज्यांकडून भूमिका मागवली होती. सर्व उत्तर आल्यानंतर या कायद्यांच्या अंमलबजावणीला स्थगिती द्यावी का, यावर निर्णय घेतला जाईल, असे न्यायालयाने तेव्हाच स्पष्ट केले होते. या खटल्याच्या कार्यवाहीत समन्वय राखण्यासाठी याचिकाकर्त्यांसाठी अधिवक्ता सृष्टी यांची, तर प्रतिवादी राज्यांसाठी अधिवक्ता रुचिरा यांची नोडल वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान, यापूर्वी केंद्र सरकारने आंतरधर्मीय विवाहांमुळे होणाऱ्या धर्मांतरांवर नियंत्रण ठेवणाऱ्या राज्य कायद्यांना आव्हान देणाऱ्या काही स्वयंसेवी संस्थांच्या भूमिकेवर आक्षेप घेतला होता. काही याचिकाकर्ते राजकीय हेतूने न्यायालयीन प्रक्रियेचा गैरवापर करत असल्याचा आरोपही केंद्राने केला आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडसारख्या राज्यांतील कायदे केवळ आंतरधर्मीय विवाहांपुरते मर्यादित नसून सर्व प्रकारच्या धर्मांतरांवर विस्तृत नियम लादतात. या कायद्यांनुसार बळजबरी, फसवणूक किंवा प्रलोभनाने धर्मांतर केल्यास कठोर शिक्षेची तरतूद आहे.

याचिकाकर्त्यांचा दावा आहे की हे कायदे भारतीय संविधानातील कलम २१ आणि २५ चे उल्लंघन करतात, कारण ते व्यक्तीच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर आणि इच्छेप्रमाणे धर्म पाळण्याच्या अधिकारावर गदा आणतात. या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय देशभरातील धर्मांतरविरोधी कायद्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे.